01 DEC 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरूष कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ संघास चषक देऊन गौरविताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. महेश काकडे, डॉ. डी. आर. मोरे, ॲड. धैर्यशील पाटील, संजय जाधव, डॉ. रमेश भेंडीगिरी, डॉ. बाबासाहेब उलपे व डॉ. पी. टी. गायकवाड. २) उपविजेत्या मुंबई विद्यापीठ संघाला चषक देऊन सन्मानित करताना कुलगुरु डॉ. शिंदे.

# कबड्डीत शिवाजी विद्यापीठ नंबर १!

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा: मुंबई विद्यापीठाला उपविजेतेपद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात गेले पाच गाजत राहिलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरूष कबड्डी स्पर्धेत यजमान शिवाजी विद्यापीठ संघाने मुंबई विद्यापीठास २९-२१ अशा गुणफरकांनी हरवून अव्वलस्थान मिळवले. मुंबई विद्यापीठ संघाला दुसऱ्या तर औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठला तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात स्पर्धा झाली.

स्पर्धेच्या प्रथम क्रमांकासाठी शिवाजी विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ संघ यांच्यात अंतिम लढत झाली. अत्यंत चुरशीने सुरू असलेला हा सामना संपण्यास काहींच मिनिटांचा अवधी शिल्लक असताना पंचांच्या निर्णयाला आक्षेप घेत मुंबई विद्यापीठाच्या संघाने मैदान सोडले. वारंवार विनंती करुनही मुंबई विद्यापीठ संघ मैदानात परत आलाच नाही. त्यामुळे २९-२१ अशा गुणफरकांनी आघाडीवर असलेल्या शिवाजी विद्यापीठास सामन्यात विजयी घोषित करुन स्पर्धेचे जेतेपद बहाल करण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ संघाची एकही हार झाली नाही. साखळी फेरीतील तीनही सामने जिंकून सहा गुणांसह गुणतक्त्यात आघाडीचे स्थान प्राप्त केले.

### मराठवाडा विद्यापीठ तिसरे

तिसऱ्या क्रमांकासाठी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि राजस्थानच्या कोटा विद्यापीठ यांच्यात लढत झाला. पहिल्या गुणापासून ते अखेरच्या गुणापर्यंत हा सामना अतिशय अत्यंत चुरशीने खेळला गेला. अगदी बरोबरीने हलत राहिलेल्या गुणफलकामुळे प्रेक्षकही अक्षरश: श्वास रोखून सामना पाहत होते. अखेरच्या मिनिटातही सामना ३८-३८ असा बरोबरीवर आला होता. याचवेळी मोठ्या चपळाईने चाल एक गुणाची कमाई करत आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघाने कोटा विद्यापीठ संघाचा ३९-३८ असा अवघ्या एका गुणफरकांच्या आघाडीने सामना जिंकून तिसरा क्रमांक पटकावला.

### विजेत्या शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडू

अक्षय प्रकाश निकम (के.एन.पी. महाविद्यालय, वाळवा), राहुल अनिल वडार (के.बी.पी. महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर), सौरभ रविंद्र कुलकर्णी (के.बी.पी. महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर), ऋषीकेश संभाजी देसाई, निखील भीमराव पाटील, सौरभ तानाजी पाटील, अक्षय देवानंद पाटील, साईनाथ महादेव कोंडुसकर (पाचही खेळाडू राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), रोहित पुरूषोत्तम पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आसुर्ले-पोर्ले), अनिकेत बाबासाहेब चव्हाण (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर), संकेत राजू माने (नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲन्ड कॉमर्स, इचलकरंजी) आणि रोहन विजय शिंगाडे (कृष्णा महाविद्यालय, रेठरे-बुद्रुक).

या सामन्यांनंतर झालेल्या बक्षीस वितरण समारंभात राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या साखळी फेरीतील चारही संघांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते चषक देऊन गौरविले.

यावेळी भारतीय विद्यापीठ महासंघ (एआययु) आणि शिवाजी विद्यापीठ यांचे ध्वज अनुक्रमे प्रा. सुनील खराडे आणि प्रा. विजय रोकडे यांनी सन्मानपूर्वक उतरविले. यानंतर हे ध्वज कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे सोपविले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे, संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी.आर. मोरे, ॲड. धैर्यशील पाटील, संजय जाधव, प्रा. संभाजी पाटील, डॉ. रमेश भेंडेगिरी, उमा भेंडेगिरी-भोसले, डॉ. बाबासाहेब उलपे, अजित पाटील यांच्यासह कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. दीपक पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले.

### जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्य

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरूष कबड्डी स्पर्धा गेल्या पाच दिवसांपासून शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मॅटवर खेळविली गेली. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये विद्यापीठ प्रशासनाच्या बरोबरीने कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशननेही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच स्कोअरर आणि पंचही पुरविले. डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. सुनील चव्हाण, श्री. संभाजी पाटील आदींनीही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले.



### प्रेक्षक गॅलरीत कुलगुरूंसह अधिकारी

शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यातील पहिल्या क्रमांकासाठी झालेल्या अंतिम सामन्याला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. सामना सुरू करून दिल्यानंतर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी थेट प्रेक्षक गॅलरीकडे कूच केले आणि विद्यार्थ्यांच्या मांडीला-मांडी लावून गॅलरीत बसून सामन्याचा आनंद लुटला. त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांही प्रेक्षक गॅलरीत बसून सामन्याचा आनंद लुटला.

# शिवाजी अव्वल; मुंबई दुसरे

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धा



कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते विजेतेपदाचा चषक स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा संघ. व उपविजेतेपदाचा चषक स्वीकारताना मुंबई विद्यापीठाचा संघ. (छाया : एस. अली)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठात गेल्या सोमवारपासून सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धेत शुक्रवारी यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने मुंबई विद्यापीठास २९-२१ असे नमवित अव्वल स्थान पटकावले.

स्पर्धेच्या प्रथम क्रमांकासाठीची लढत शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाच्या संघात झाली. अतिशय अटीतटीने सुरू असलेला हा सामना संपण्यास अवघी काही मिनिटे शिल्लक असताना पंचांच्या एका निर्णयाला आक्षेप घेत मुंबई विद्यापीठाच्या संघाने सामना सोडला. त्यामुळे २९-२१ अशा आठ गुणांनी आघाडीवर असलेल्या शिवाजी विद्यापीठास विजयी घोषित करण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा संघ अजिंक्य राहिला आणि साखळी फेरीतील तीनही सामने जिंकून सहा गुणांसह गुणतक्त्यात आघाडीचे स्थान प्राप्त केले.

तिसऱ्या क्रमांकासाठीचा सामना औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि राजस्थानचे कोटा विद्यापीठ यांच्यात रंगला. पहिल्या गुणापासून ते अखेरच्या गुणापर्यंत हा सामना अत्यंत चुरशीचा झाला. अगदी बरोबरीने हलणाऱ्या गुणफलकाने प्रेक्षकांना श्वास रोखून धरायला लावले. अखेरच्या मिनिटातही सामना ३८-३८ असा बरोबरीत होता. अगदी अखेरच्या चालीत एक गुण मिळवून औरंगाबाद विद्यापीठाने हा सामना ३९-३८ असा अवघ्या एका गुणाने जिंकला.

सामन्यानंतर लगेचच राष्ट्रीय फेरीसाठी पात्र ठरलेल्या साखळी फेरीतील चारही संघांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत चषक देऊन गौरवण्यात आले.

पारितोषिक वितरणानंतर भारतीय विद्यापीठ महासंघ (ए. आय. यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांचे ध्वज अनुक्रमे प्रा. सुनील खराडे आणि प्रा. विजय रोकडे यांनी सन्मानपूर्वक उतरविले आणि कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे सोपविले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य अ‍ॅड. धैर्यशील पाटील, संजय जाधव, प्रा. संभाजी पाटील, डॉ. रमेश भेंडीगिरी, उमा भेंडीगिरी-भोसले, डॉ. बाबासाहेब उलपे, अजित पाटील यांच्यासह कोल्हापूर जिल्हा कबड्डी असो.चे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. दीपक पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी टी. गायकवाड यांनी आभार मानले.

### जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सहकार्य

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धा गेल्या सोमवारपासून शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात मॅटवर खेळवली गेली. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनामध्ये विद्यापीठ प्रशासनाच्या बरोबरीने कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशनने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली. स्पर्धेला आवश्यक ते संपूर्ण सहकार्य करण्याबरोबरच स्कोअरर आणि पंच म्हणूनही संघटनेच्या सदस्यांनी महत्त्वाचे योगदान दिले.

### अंतिम गुणतक्ता

| संघ | विजय | पराजय | गुण |
|---|---|---|---|
| शिवाजी विद्यापीठ | ०३ | ०० | ०६ |
| मुंबई विद्यापीठ | ०२ | ०१ | ०४ |
| डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | ०१ | ०२ | ०२ |
| कोटा विद्यापीठ | ०० | ०३ | ०० |

### शिवाजी विद्यापीठ संघातील सदस्य

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकावणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडू (कंसात महाविद्यालय) : अक्षय प्रकाश निकम (के. एन. पी. महाविद्यालय, वाळवा), राहुल अनिल वडार (के. बी. पी. महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर), सौरभ कुलकर्णी (के. बी. पी. महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर), ऋषिकेश देसाई-कौजलगी (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), निखिल भीमराव पाटील (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), सौरभ तानाजी पाटील (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), अक्षय पाटील (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), साईनाथ कोंडुसकर (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), रोहित पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आसुर्ले-पोर्ले), अनिकेत बाबासाहेब चव्हाण (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर), संकेत राजू माने (नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅन्ड कॉमर्स, इचलकरंजी) आणि रोहन विजय शिंगाडे (कृष्णा महाविद्यालय, रेठरे-बुद्रुक). संघ प्रशिक्षक म्हणून डॉ. रमेश भेंडीगिरी आणि व्यवस्थापक म्हणून डॉ. बाबासाहेब उलपे यांनी काम पाहिले.

लोकमत

## पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धा : मुंबई विद्यापीठाला उपविजेतेपद

# शिवाजी विद्यापीठ विजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अव्वल साखळी फेरीतील सर्व सामने जिंकत यजमान शिवाजी विद्यापीठाने पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद शुक्रवारी पटकाविले. या संघाने सर्वाधिक सहा गुणांची कमाई केली. चार गुणांसह मुंबई विद्यापीठ उपविजेते ठरले. दोन गुणांवर असणाऱ्या औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने तिसरा क्रमांक मिळविला. चौथ्या स्थानी राजस्थानचे कोटा विद्यापीठ राहिले. हे संघ केआयआयटी भुवनेश्वर येथे दि.२६ डिसेंबरपासून होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी पात्र ठरले.

असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजने यावर्षी शिवाजी विद्यापीठात पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धा घेतली. गेल्या चार दिवसांपासून रंगलेल्या या स्पर्धेचा शुक्रवारी समारोप झाला. स्पर्धेतील विजेत्या संघांना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते चषक देऊन गौरविण्यात आले. कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेतर्फे विजेतेपदाचे चषक देण्यात आले. या संघटनेचे संभाजी पाटील, रमेश भेंडेगिरी, उमा भेंडेगिरी, बाबासाहेब उलपे, अण्णासाहेब गावडे, अजित पाटील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, संजय जाधव, सेवक संघाचे अध्यक्ष बाबा सावंत, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. सुनील खराडे, विजय रोकडे, आदी उपस्थित होते. दीपक पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले. या स्पर्धेत ६८ संघ सहभागी झाले होते. त्यांच्यात पहिल्यांदा बादफेरीतील लढत झाली. त्यातून अव्वल साखळी फेरीत प्रवेश केलेल्या शिवाजी विद्यापीठ, मुंबई, औरंगाबाद आणि कोटा विद्यापीठात मानांक्नासाठी लढती झाली. त्यात सर्व सामने जिंकून शिवाजी विद्यापीठ अव्वलस्थानी राहिले. त्यापाठोपाठ मुंबई, औरंगाबाद आणि कोटा विद्यापीठ राहिले. या चारही विद्यापीठांच्या संघांना पुढील वर्षी होणाऱ्या पश्चिम विभागीय स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत थेट प्रवेश मिळाला आहे. दरम्यान, शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यातील पहिल्या क्रमांकासाठीच्या सामन्यास कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला.




नसीर अत्तार



कोल्हापुरात शुक्रवारी पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा संघ विजेता ठरला. या संघाला कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आले. यावेळी डावीकडून संजय जाधव, महेश काकडे, विलास नांदवडेकर, डी. टी. शिर्के, पी. टी. गायकवाड, धैर्यशील पाटील, बाबा सावंत, डी. आर. मोरे आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ यांच्यातील सामना चुरशीने झाला तो क्षण.

## शिवाजी विद्यापीठाचा संघ

अक्षय निकम, राहुल वडार, सौरभ कुलकर्णी, ह्रषीकेश देसाई-कौजलगी, निखील पाटील, सौरभ पाटील, अक्षय पाटील, साईनाथ कोंडुसकर, रोहित पाटील, अनिकेत चव्हाण, संकेत माने, रोहन शिंगाडे, संघप्रशिक्षक डॉ. रमेश भेंडेगिरी, व्यवस्थापक डॉ. बाबासाहेब उलपे.

## संघनिहाय गुण

| संघ | गुण | विजय | पराजय |
|---|---|---|---|
| शिवाजी विद्यापीठ | ६ | ३ | ० |
| मुंबई विद्यापीठ | ४ | २ | १ |
| औरंगाबाद विद्यापीठ | २ | १ | २ |
| कोटा विद्यापीठ | ० | ० | ३ |

**सामन्यांत चुरस :** दरम्यान, शुक्रवारी सकाळी साखळी फेरीतील पहिला सामना शिवाजी विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठात झाला. शेवटची चार मिनिटे बाकी असताना पंचांनी दिलेला निर्णय अमान्य करत मुंबई विद्यापीठाने सामना सोडला. अखेर शिवाजी विद्यापीठाला पंचांनी २९-२१ अशा गुणांनी विजयी घोषित केले. अत्यंत चुरशीने झालेल्या दुसऱ्या सामन्यात औरंगाबाद विद्यापीठाने कोटा विद्यापीठावर ३९-३८ अशा गुणांनी निसटता विजय मिळविला.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाला विजेतेपद

## पश्चिम विभागीय कबड्डी स्पर्धा

कोल्हापूर, ता. ३० : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष कबड्डी स्पर्धेत आज यजमान शिवाजी विद्यापीठाच्या संघाने मुंबई विद्यापीठास २९-२१ असे नमवत विजेतेपद पटकावले.

या दोन्ही संघांतील अंतिम सामना अतिशय अटीतटीने सुरू असताना अंतिम क्षणी पंचांच्या एका निर्णयाला आक्षेप घेत मुंबई विद्यापीठाच्या संघाने सामना सोडला. त्यामुळे २९-२१ अशा आठ गुणांनी आघाडीवर असलेल्या शिवाजी विद्यापीठास विजयी घोषित करण्यात आले. संपूर्ण स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाचा संघ अजिंक्य राहिला आणि साखळी फेरीतील तीनही सामने जिंकून सहा गुणांसह गुणतक्त्यात आघाडीचे स्थान प्राप्त केले.

तिसऱ्या स्थानासाठी औरंगाबादचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि राजस्थानचे कोटा विद्यापीठ यांच्यात अत्यंत चुरशीची लढत झाली. अखेरच्या मिनिटातही सामना ३८-३८ असा बरोबरीत होता. अगदी अखेरच्या चालीत एक गुण मिळवून डॉ. आंबेडकर विद्यापीठाने सामना ३९-३८ असा अवघ्या एका गुणाने जिंकला.



**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी विजेतेपदाचा करंडक स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाचा कबड्डीचा संघ.**

सामन्यांनंतर लगेचच राष्ट्रीय फेरीसाठी पात्र ठरलेल्या साखळी फेरीतील चारही संघांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत चषक देऊन गौरविण्यात आले.

या वेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य अॅड. धैर्यशील पाटील, संजय जाधव, प्रा. संभाजी पाटील, डॉ. रमेश भेंडेगिरी, उमा भेंडेगिरी-भोसले, अजित पाटील उपस्थित होते. दीपक पाटील यांनी स्वागत केले. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी आभार मानले.

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत विजेतेपद पटकावणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडू (कंसात महाविद्यालय) असे : अक्षय प्रकाश निकम (केएनपी महाविद्यालय, वाळवा), राहुल अनिल वडार (केबीपी महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर), सौरभ रवींद्र कुलकर्णी (केबीपी महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर), ऋषीकेश संभाजी देसाई-कौजलगी (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), निखिल भीमराव पाटील (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), सौरभ तानाजी पाटील (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), अक्षय देवानंद पाटील (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), साईनाथ महादेव कोंडुस्कर (राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय, कोल्हापूर), रोहित पुरुषोत्तम पाटील (कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आसुर्ले-पोर्ले), अनिकेत बाबासाहेब चव्हाण (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर), संकेत राजू माने (नाईट कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स, इचलकरंजी) आणि रोहन विजय शिंगाडे (कृष्णा महाविद्यालय, रेठरे-बुद्रुक). संघ प्रशिक्षक : डॉ. रमेश भेंडेगिरी, व्यवस्थापक : डॉ. बाबासाहेब उलपे.

1 DEC 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खो-खो महिला संघास राष्ट्रीय स्पर्धेसाठी कुलगुरुंनी दिल्या शुभेच्छा

प्रतिनिधी
कोल्हापूर

मंगळूर येथे झालेल्या अखिल भारतीय थाळीफेक स्पर्धेत सुवर्णपदक विजेता खेळाडू कीर्तीकुमार जयप्रकाश बेनके आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव येथे झालेल्या पश्चिम विभागीय महिला आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या शिवाजी विद्यापीठाचा संघाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी अभिनंदन केले. तसेच राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी महिला संघास शुभच्छा दिल्या.

मंगळूर विद्यापीठ, मंगळूर (मोडबीद्री) येथे झालेल्या अखिल भारतीय थाळीफेक स्पर्धेत (२०१८-१९) चंदगड येथील र.भा. माडखोलकर महाविद्यालयाचा खेळाडू कीर्तीकुमार जयप्रकाश बेनके याने (५३.५९ मी.) सुवर्णपदक प्राप्त केले. कोवाड येथील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्रशिक्षक प्रा.आर.टी. पाटील तसेच कडेगाव येथील कन्या महाविद्यालयाच्या संघ व्यवस्थापक



कोल्हापूर : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावून फैजाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विद्यापीठाच्या महिला खो-खो संघासमवेत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. हर्षवर्धन पाचोरे, प्रा. दत्ता मोहिते.

शिफा मोहिते यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे पश्चिम विभागीय महिला आंतरविद्यापीठ खो-खो स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करून फैजाबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या विद्यापीठाच्या महिला खो-खो संघालाही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धा ७ ते १० डिसेंबर या कालावधीत होणार आहे. संघात करिष्मा रिकीबदार, अमृता कोकीतकर, ऋतुजा खाडे, पूजा फातले, ज्योती शिंदे, तनुजा शिंदे, सन्मती कोल्हे, कोमल शिंदे, मोनिका झेंडे, धनश्री भोसले, करिष्मा नगारजी, पल्लवी मर्डी यांचा समावेश आहे. संघ मार्गदर्शक प्रा.हर्षवर्धन पाचोरे, संघ व्यवस्थापक प्रा. दत्ता मोहिते आहेत.